कृपया प्रसिध्दी करिता

माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
१३/१०/२०२५

समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
दिनांक

## प्रेस नोट

### पुणे महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त समाज विकास विभागामार्फत बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे
### दिवाळी बचत बाजार प्रदर्शन व विक्री उपक्रम

➢ पुणे महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त समाज विकास विभागामार्फत बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी तसेच महिलांना सक्षम बनवून त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावणेच्या दृष्टीने महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे **दिवाळी निमित्त बचत बाजार प्रदर्शन व विक्री उपक्रम** दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ ते दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सकाळी १०.०० वा. ते सायं. १०.०० पर्यंत खालील ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे.

| अ. क्र. | बचत बाजार प्रदर्शनाचे स्थळ | एकूण सहभागी स्टॉल संख्या |
|---|---|---|
| १. | नविन भाजी मंडई, पुण्यनगरी शेजारी, स्टेलामेरी शाळेसमोर, वडगावशेरी, पुणे | १२० |
| २. | पु. ल. देशपांडे उद्यान, सिंहगड रोड, पुणे ३० | १५८ |
| ३. | कै. नथुजी मेंगडे जलतरण तलाव, कमिन्स कॉलेजजवळ, शाहू कॉलनी, कर्वेनगर, पुणे-०५ | ९३ |
| ४. | कात्रज दुध डेअरी, एक्स्पो मैदान, कात्रज, पुणे | १६३ |
| ५. | जीत मैदान, वनाज मेट्रो स्टेशन जवळ, वनाज, पुणे | १७४ |
| ६. | झेन्सॉर आय. टी. कपंनी पार्क मैदान, खराडी, पुणे | ८५ |

➢ यामध्ये बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
दिवाळी फराळ : चकली, लाडू, करंजी, शंकरपाळी, चिवडा, शेव, अनारसे, पणत्या, रांगोळी, दीपपाळा, आकाशकंदिल, इतर खाद्यपदार्थ-वांग्याचे भरीत, पिठलं-भाकरी, मांडे, सॉस, शीतपेय, सोलकढी, लोणची, पापड, विविध मसाले, तयार पिठे, शेवया, कुरड्या, या व्यतिरिक्त बिर्याणी व इतर शाकाहारी व मांसाहरी खाद्यपदार्थांचे विविध प्रकार, तसेच घरगुती वापरातील विविध वस्तू-स्वेटर्स, रांगोळी, रंग, तयार कपडे, तोरण, आयुर्वेदिक उत्पादने, प्लॅस्टिकला पर्याय म्हणून विविध प्रकारच्या कागदी, कापडी पिशव्या, लेदर पिशव्या, कापडी फाईल्स,फोल्डर, पेपर प्रॉडक्टस्, ज्वेलरी व सौंदर्य प्रसाधने, अगरबत्ती इ. विविध प्रकार इत्यादी विविध प्रकारच्या वस्तु/साहित्य विक्रीस उपलब्ध राहणार आहेत.

➢ सदर प्रदर्शनामध्ये पुणे महानगरपालिका हद्दीतील बचत गटातील महिला, विविध सामाजिक संस्था, तसेच दिव्यांग लाभार्थ्यांचे स्टॉल लावणेत आलेले आहे. सदर प्रदर्शनाच्या दिनांक ११ व १२ ऑक्टोबर अशा दोन दिवसांची एकूण विक्री र. रु. १९,००,०००/- (अक्षरी र.रु. एकोणीस लाख) इतकी झालेली आहे.

➢ सदर प्रदर्शनास भेट देण्याबाबत पुणे शहरातील नागरिकांना पुणे महानगरपालिके तर्फे आवाहन करण्येत येत आहे.

(जयंत भोसेकर)
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

मा. संपादक
दैनिक ............

कृपया सदरची प्रेसनोट आपल्या दैनिकात प्रसिद्ध करणेस विनंती आहे.

(जयंत भोसेकर)
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका